

कोकणचं बाणेदार वृत्तपत्र

# कोकणनामा

kokannama.in

KOKANNAMA WEEKLY साप्ताहिक

RNI Regi. No. MAHMAR/2012/48580
Postal Regi. No. RGD/043/2025-2027
Email : kokannama12@gmail.com

मुख्य संपादक : उमाजी म. केळुसकर
मोबा. ९०११३६०१६८

वर्ष : १५, अंक : ३२, पृष्ठे : ४, किंमत : ३ रु., अलिबाग, गुरुवार, दिनांक १ ते ७ ऑक्टोबर २०२६




विचारांची ज्योत आणि राष्ट्रनिर्मितीचे दोन खांब

पान २



अरुण कर्नाटकी एक अनुभवी जाणता दिग्दर्शक!

पान ३



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळणार हक्काचे व्यासपीठ

पान ४

# माजी अग्निवीरांच्या भविष्याला सुरक्षा

## शासकीय व निमशासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी राज्य सरकारकडून नवीन धोरण

**मुंबई, कोकणनामा वृत्त- सैन्य दलात चार वर्षांची देशसेवा पूर्ण करून निवृत्त होणाऱ्या माजी अग्निवीरांच्या भविष्याला सुरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत माजी अग्निवीरांना शासकीय आणि निमशासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी एक सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यात आले आहे. या ऐतिहासिक निर्णयानुसार, राज्य शासनाच्या गट-क मधील गणवेशधारी सेवांच्या भरतीमध्ये माजी अग्निवीरांसाठी १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यास अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे.**



अग्निवीर योजनेअंतर्गत सैन्य दलात दाखल झालेल्या जवानांपैकी २५ टक्के जवानांना सेवेत कायम ठेवले जाते, तर उर्वरित ७५ टक्के जवान चार वर्षांचा सेवाकाळ पूर्ण करून बाहेर पडतात. या पार्श्वभूमीवर, या तरुणांना मुख्य प्रवाहात आणणे आणि त्यांच्या अनुभवाचा लाभ राज्याला मिळवून देणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. या निर्णयानुसार, महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असलेल्या माजी अग्निवीरांना पोलिस दल, वनरक्षक यांसारख्या विविध गट-क मधील गणवेशधारी सेवांमध्ये १० टक्के समांतर आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. हे आरक्षण कप्पीकृत समांतर स्वरूपाचे असणार असून, काही विशिष्ट पदांवर १० टक्क्यांहून अधिक आरक्षणाची गरज भासल्यास सामाजिक आरक्षण अबाधित ठेवून ही मर्यादा शिथिल करण्याचे अधिकार उच्चस्तरीय सचिव समितीला प्रदान करण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, सैन्य दलात सेवा बजावताना या जवानांनी कठोर शारीरिक क्षमता चाचण्या, शिस्त आणि उच्च दर्जाचे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केलेले असते. त्यामुळे राज्य सेवेत दाखल करून घेताना त्यांच्यावर कोणतीही स्वतंत्र स्पर्धा परीक्षा किंवा अतिरिक्त प्रशिक्षणाची सक्ती केली जाणार नाही. तसेच, सेवा प्रवेशासाठीच्या वयोमर्यादेमध्ये अग्निवीरांना त्यांनी सैन्य दलात घालवलेल्या चार वर्षांएवढी सवलत दिली जाणार आहे, ज्यामुळे वयोमर्यादेची कोणतीही अडचण त्यांच्या मार्गात येणार नाही.

भरती प्रक्रियेदरम्यान पुरेशा रिक्त जागा किंवा नियमित पदे उपलब्ध न झाल्यास, पात्र माजी अग्निवीरांना सामावून घेण्यासाठी अधसंख्ये पदे निर्माण करण्याचा नाविन्यपूर्ण पर्याय देखील राज्य सरकारने ठेवला आहे. यामुळे पदसंख्येची मर्यादा किंवा कमतरता या तरुणांच्या नोकरीच्या मार्गात कधीही अडथळा ठरणार नाही. याशिवाय, नौदल किंवा इतर दलांमधून सेवा पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या अग्निवीरांच्या तांत्रिक ज्ञानाचा आणि अनुभवाचा वापर किनारपट्टी सुरक्षा (कोस्टल सिक्युरिटी) तसेच सिक्युरिटीशी संबंधित इतर शासकीय व निमशासकीय सेवांमध्ये करून घेण्याची मोलाची भूमिका शासनाने मांडली आहे.

माजी सैनिकांसाठी उपलब्ध असलेल्या काही रिक्त पदांवर यापूर्वीच तरतूद असताना, आता अग्निवीरांसाठी स्वतंत्र व निश्चित धोरण आल्यामुळे त्यांच्यासाठी रोजगाराचे नवे मार्ग खुले झाले आहेत. राज्याच्या या निर्णयामुळे देशाचे रक्षण करणाऱ्या वीर जवानांचे पुढील आयुष्य आर्थिकदृष्ट्या सुरक्षित होण्यास मोठी मदत होणार असून, त्यांच्या शिस्तप्रिय व तंदुरुस्त अनुभवाचा फायदा महाराष्ट्राच्या शासकीय व सुरक्षा यंत्रणांना अधिक बळकट करण्यासाठी होईल.

# महाडमध्ये मोकाट जनावरांचा त्रास

**महाड, कोकणनामा वृत्त- महाड शहरात मोकाट जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला असून यामुळे नागरिक, वाहनचालक आणि पादचाऱ्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे. बाजारपेठ तसेच मुख्य रहदारीच्या रस्त्यांवर मोकाट जनावरे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.**

मंगळवारी रस्त्यावर फिरणाऱ्या एका म्हशीला वाहनाची धडक बसल्याने ती जखमी झाली असून, काही दिवसांपूर्वी बैलाने चारचाकी वाहनाला धडक दिल्याने वाहनाचे नुकसान झाले होते. गणेशोत्सवादरम्यान बाजारपेठेसह प्रमुख रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. रस्त्यावर अचानक धावणाऱ्या जनावरांमुळे वाहनांचे नियंत्रण सुटून अपघातांची शक्यता असते, ज्यामुळे दुचाकीस्वार व पादचाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

गणेशोत्सवापूर्वी महाड नगर परिषदेच्या सभेत यावर चर्चा करून जनावरांना मोकाट सोडणाऱ्या मालकांवर दंडात्मक व जनावरे पकडून लिलाव करण्याची कारवाई करण्याचे निर्देश नगराध्यक्ष सुनील कविसकर यांनी दिले होते. मात्र, त्यानंतरही शहरातील परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. शाळा परिसर, प्रमुख चौक व गर्दीच्या ठिकाणी मोकाट जनावरांचा वावर अधिक धोकादायक ठरत आहे.

# कॅश ट्रॅप लावून एटीएममधील रक्कम लांबवणारा चोरटा अखेर सापडला तळोजा पोलिसांच्या जाळ्यात!

**पनवेल, कोकणनामा वृत्त- पनवेल आणि तळोजा परिसरातून एटीएममधून पैसे काढणाऱ्या साध्याभोळ्या ग्राहकांना लुटणाऱ्या एका चलाख चोराला तळोजा पोलिसांनी अत्यंत शिताफीने आणि रंगेहात जेरबंद केले आहे. अकिब मो. इर्शाद खान (२२, रा. तळोजा) असे या २२ वर्षीय अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. हा तरुण एटीएमच्या कॅश डिस्पेंसिंग स्लॉटमध्ये अत्यंत चलाखीने आणि नियोजनबद्ध पद्धतीने पत्राची पट्टी किंवा डबल चिकट टेप लावलेली निळ्या रंगाची पोकळ पत्र्याची पट्टी अडकवत असे.**

या क्लृप्तीमुळे ग्राहक एटीएममधून पैसे काढण्यासाठी कमांड दिल्यानंतर, प्रत्यक्षात बाहेर पडणारी रक्कम त्या पत्र्याच्या पट्टीमुळे स्लॉटमध्येच अडकून राहत असे. ग्राहक आपले पैसे आले नाहीत असे समजून तिथून निघून जात असे. ग्राहक निघून जाताच हा चोर पुन्हा तिथे येऊन ती अडकलेली रक्कम परस्पर काढून घेत असे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सीसीटीव्ही कमांड सेंटरमधील कर्मचाऱ्यांची सतर्कता आणि गस्तीवर असलेल्या बीट मार्शलच्या तत्परतेमुळे हा पर्दाफाश झाला. तळोजा फेज-१ येथील ॲक्सिस बँकेच्या एटीएममध्ये अकिब खानच्या संशयास्पद हालचाली कॅमेऱ्यात टिपल्या गेल्या. कमांड सेंटरमधील अंमलदारांनी तातडीने संशयिताचा फोटो व व्हीडीओ गस्तीवरील पोलिसांना पाठवला. माहिती मिळताच बीट मार्शल-१ वरील गस्त घालणारे पोलीस हवालदार लुवीस मोजेस लॉजेरस आणि पोलीस शिपाई अभिजीत इनामदार यांनी संबंधित एटीएम केंद्र गाठले.

पोलिसांनी पाहणी केली असता, कॅश डिस्पेंसिंग स्लॉटजवळ पोकळ पत्राची पट्टी व त्यावर चिकट टेप लावलेले निदर्शनास आले, जी पोलिसांनी जप्त केली. त्यानंतर एटीएम बाहेर शोध घेतला असता, वर्णनानुसार एक व्यक्ती रस्त्यावर उभी असल्याचे दिसून आली. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्हा कबूल केला. अकिब खानने अशाच पद्धतीने आणखी किती ग्राहकांची रक्कम लांबवली, याबाबत तळोजा पोलीस तपास करत असून, त्याच्या चौकशीतून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.






# आसूडगाव मेडिकलवर छापा, नशिल्या कॅप्सूल जप्त

**पनवेल, कोकणनामा वृत्त- खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आसूडगाव येथे अंमली पदार्थविरोधी पथक आणि अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने संयुक्त कारवाई करत बेकायदेशीर औषध विक्रीचा पर्दाफाश केला. या कारवाईत डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय नशेशेसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रोगेबलिनच्या तब्बल २ हजार २३० कॅप्सूल हस्तगत करण्यात आल्या. तसेच सिरिंजचीही बेकायदेशीर विक्री होत असल्याचे तपासात समोर आले. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

कारवाईदरम्यान महादेव मेडिकल प्रेगाबालिन कॅप्सूल हस्तगत करण्यात आल्या. मेडिकलमधून जप्त केलेल्या १५० कॅप्सूल आणि पुरवठादाराकडून हस्तगत केलेल्या २ हजार ८० कॅप्सूल मिळून एकूण २ हजार २३० कॅप्सूल जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी औषधे आणि सौंदर्यप्रसाधने कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी म्हणून नारायणसिंग भोपाळसिंग (रा. आसूदगाव, पनवेल), अनिल शंकरलाल प्रजापती (वय २६, रा. खांदा कॉलनी) आणि विशाल महीपती भोसले (वय ३०, रा. आदई गाव, मूळ रा. कोल्हापूर) यांना अटक करण्यात आली आहे. अंमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

मुख्य संपादक
उमाजी म. केळुसकर

निवासी संपादक
शरद कोरडे

जाहिरात प्रमुख
विश्वनाथ ग. पाटील

व्यवस्थापिका
सौ. योगिता केळुसकर

ए-१०१, पहिला मजला, गंगाधर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१

Email : kokannama12@gmail.com

## संपादकीय

# डिजिटल जगात बालकांचे रक्षण

डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान आणि इंटरनेटने मानवी जीवन अत्यंत सुलभ केले असले, तरी या आभासी जगात एक अत्यंत भीषण आणि संतापजनक बाजू हळूहळू आपले पाय पसरत आहे. अलीकडेच ऑनलाइन पाहणीदरम्यान बाल लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह व्हिडिओ व छायाचित्रे तयार करणे, बाळगणे आणि प्रसारित करणाऱ्या खात्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. ही घटना संपूर्ण डिजिटल सुरक्षिततेवर उपस्थित झालेले एक गंभीर प्रश्नचिन्ह आहे. पोलिसांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पथकाने अत्यंत कौतुकास्पद कारवाई करत या विकृत प्रवृत्तीच्या लोकांच्या मुसक्या आवळल्या आहेत. प्राप्त माहितीनुसार, रेवदंडा, मुरुड, खोपोली, खालापूर आणि दादर सागरी पोलीस ठाणे या क्षेत्रांतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, एकूण पाच गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्यांमध्ये अनुक्रमे १६ वर्षे ६ महिने, १९, २८, २४ आणि २५ वर्षे वयाच्या व्यक्तींचा सहभाग असल्याचे उघडकीस आले आहे. अल्पवयीन मुलांपासून ते तरुणांपर्यंतच्या वयोगटातील व्यक्ती अशा अत्यंत घृणास्पद गुन्ह्यांमध्ये अडकणे, हे आपल्या नैतिक मूल्यांच्या घसरणीचे द्योतक आहे. इंटरनेटच्या अमर्याद स्वातंत्र्याचा गैरवापर करून अशी सामग्री साठवणे म्हणजे मानवतेच्या पाठीत खंजीर खुपण्यासारखे आहे. कायद्याच्या कठोर बाजूचा विचार करता, पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. परंतु, केवळ कायदेशीर कारवाई करून हा प्रश्न सुटणारा नाही. आजच्या घडीला सर्वात मोठी चिंताजनक बाब म्हणजे मोबाईल आणि इंटरनेटचा मुलांच्या हातात झालेला अनिर्बंध वावर आहे. पालकांनी आपल्या मुलांना हव्यात त्या सुविधा दिल्या, पण आभासी जगातील धोक्यांपासून त्यांचे रक्षण कसे करावे, याकडे दुर्लक्ष केले. मुले इंटरनेटवर काय पाहतात, कोणाशी चॅट करतात, याची साधी कल्पनाही पालकांना नसते. आरोपींचे वयोमान पाहिल्यास तरुण पिढी या दलदलीत कशी अडकत चालली आहे, याचे भीषण चित्र समोर येते. सोशल मीडियावरील लाईक्स आणि झटपट प्रसिद्धीच्या मोहात पडून अनेक तरुण अशा बेकायदेशीर गोष्टींकडे आकर्षित होतात. या सगळ्या परिस्थितीमध्ये नागरिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जोपर्यंत समाज म्हणून आपण जागरूक होत नाही, तोपर्यंत केवळ पोलिसांच्या कारवाईवर अवलंबून राहून बालकांच्या सुरक्षिततेची हमी देता येणार नाही. शालेय स्तरापासूनच मुलांमध्ये सायबर सुरक्षेचे धडे दिले गेले पाहिजेत. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या डिजिटल वापरावर सतत लक्ष ठेवले पाहिजे. बालकांचे बालपण सुरक्षित राहणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. आपल्या मुलांचे भविष्य सुरक्षित राखायचे असेल, तर पालक, शिक्षक आणि जागरूक नागरिकांनी एकजुटीने पुढे येऊन एका प्रगल्भ समाजाची निर्मिती केली पाहिजे.



वास्तव

उमाजी म. केळुसकर

# कौशल्याधारित शिक्षण ही काळाची गरज

**भारतासारख्या विकसनशील आणि वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेत शिक्षणाचे स्वरूप आणि त्याचे ध्येय यावर सध्या गांभीर्याने विचारमंथन सुरू आहे. पारंपारिक पदवी शिक्षणाला देशात दशकानुदशके प्रगतीची हमी मानले गेले असले, तरी आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात ही चौकट उलथवून टाकली जात आहे. पदवीच्या कागदपत्रांपेक्षा प्रत्यक्ष कौशल्य आणि कार्यक्षमता आत्मसात करणे ही काळाची गरज बनली असून, शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे नसून उपजीविकेचे हक्काचे साधन निर्माण करणे हा असला पाहिजे, हे आता स्पष्ट होत चालले आहे.**

भारतासारख्या विकसनशील आणि वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेत शिक्षणाचे स्वरूप आणि त्याचे ध्येय यावर सध्या गांभीर्याने विचार मंथन सुरू आहे. स्वातंत्र्यापासून आपल्या देशात पारंपारिक पदवी शिक्षणाला प्रचंड महत्त्व दिले गेले आहे. पदवी म्हणजे प्रगतीची हमी आणि नोकरीची गुरुकिल्ली, असे समीकरण दशकानुदशके रुजले गेले. उच्च शिक्षणाच्या नावाखाली लाखो तरुण दरवर्षी पदव्या घेऊन बाहेर पडतात, परंतु यातील किती जणांना त्यांच्या कौशल्याच्या बळावर प्रत्यक्ष रोजगार मिळतो, हा एक कळीचा मुद्दा बनला आहे. आजच्या जागतिक स्पर्धात्मक युगात केवळ पदवीचे कागदपत्र हातात असणे पुरेसे नाही, तर विद्यार्थ्यांकडे प्रत्यक्ष कृती करण्याची आणि नवनवीन आव्हाने पेलण्याची क्षमता असणे अत्यंत अनिवार्य झाले आहे. पारंपारिक शिक्षण प्रणालीने आपल्याला साक्षर बनवले असले, तरी उत्पादक आणि रोजगारक्षम बनवण्यासाठी कौशल्याधारित शिक्षणाची जोड देणे आता अपरिहार्य बनले आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात ही पारंपरिक चौकट उलथवून टाकली जात असून, पदवीपेक्षा कौशल्याधारित शिक्षण किंवा व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व झपाट्याने वाढू लागले आहे. ही काळाची गरज बनली असून, शिक्षणाचा उद्देश केवळ कागदोपत्री पदवी मिळवणे नसून उपजीविकेचे साधन आणि प्रत्यक्ष कौशल्य आत्मसात करणे हा असला पाहिजे, हे आता स्पष्ट होत चालले आहे.



पारंपरिक पदवी शिक्षणाचा इतिहास पाहिला तर एकेकाळी पदवी ही केवळ ज्ञानाचे संचित नसून समाजातील उच्च दर्जाचे प्रतीक मानले जात होते. मात्र, काळाच्या ओघात उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आणि पदव्यांची संख्या वाढली. परिणामी, पदवीधारकांची प्रचंड फौज तयार झाली, परंतु औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार आवश्यक असणारे व्यावहारिक ज्ञान आणि कौशल्य या पदव्यांमध्ये मिळताना दिसत नाही. आज पदवीधारक युवकांच्या हातात पदवी असते, पण उद्योगांमध्ये ज्या विशिष्ट कौशल्यांची आवश्यकता असते, त्यांचा पदवीच्या अभ्यासक्रमात अभाव असतो. या त्रुटीमुळे उद्योग जगत आणि शैक्षणिक संस्था यांच्यात मोठी खंदक निर्माण झाली असून, ही दरी भरून काढण्यासाठी व्यावहारिक प्रशिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे. म्हणूनच शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देणे ही काळाची उच्च प्राथमिकता बनली पाहिजे. यामुळे एकीकडे उच्चशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत असतानाच, दुसरीकडे कुशल कामगारांची उणीव भासत आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

कौशल्याधारित शिक्षण हे केवळ पुस्त ज्ञानावर आधारित नसून ते हाताने काम करण्याच्या, प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याच्या आणि समस्या निवारणाच्या तत्त्वावर चालते. यामध्ये माहिती तंत्रज्ञान, ऑटोमोबाईल, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, हॉटेल मॅनेजमेंट, इलेक्ट्रीकल, प्लंबिंग, हेल्थकेअर अशा अनेक व्यावहारिक क्षेत्रांचा समावेश होतो. हे शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना नोकरीसाठी वर्षांनुवर्षे वणवण करावी लागत नाही, कारण उद्योग जगताला नेमके काय हवे आहे, याचे प्रशिक्षण त्यांना आधीच मिळालेले असते. आजच्या कॉर्पोरेट जगतात केवळ पदवीधरांपेक्षा प्रत्यक्ष काम पार पाडणारे प्रॅक्टिकल एक्स्पर्ट्स मोठ्या प्रमाणावर आकर्षित केले जात आहेत. आजच्या जागतिकीकरण आणि डिजिटायझेशनच्या युगात कंपन्यांना केवळ पदवीची नाही, तर कामात तरबेज असणाऱ्या हातांची आणि ताजी व नाविन्यपूर्ण विचारसरणी असणाऱ्या डोक्यांची गरज आहे. जे तरुण किंवा तरुणी वेळेवर योग्य ते कौशल्य आत्मसात करतात, त्यांना आजच्या बाजारपेठेत सोन्याचे दिवस आहेत.

या बदलामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे वेगाने बदलणारे तंत्रज्ञान आणि ऑटोमेशनचा वाढता प्रभाव. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित यंत्रांमुळे अनेक पारंपरिक नोकऱ्यांचे स्वरूप बदलत आहे किंवा त्या नष्ट होत आहेत. अशा वेळी केवळ एकाच विषयाचे सैद्धांतिक ज्ञान असणारे पदवीधर मागे पडण्याची दाट शक्यता असते. याउलट, कौशल्याधारित शिक्षण घेणारे तरुण लवचिक असतात. ते नवीन तंत्रज्ञान झपाट्याने शिकू शकतात आणि त्यानुसार स्वतःमध्ये बदल करू शकतात. 'स्किल इंडिया' सारख्या राष्ट्रीय मोहिमांमुळे आता देशात व्यावसायिक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. पालकांमध्येही आता हा सुजाणपणा येऊ लागला आहे कि, मुलांच्या गळ्यात पारंपारिक पदवीचे ओझे अडकवण्यापेक्षा त्यांना त्यांच्या आवडीनुसार एखादे ठोस कौशल्य शिकवणे अधिक फायद्याचे ठरू शकते.

अर्थात, याचा अर्थ पारंपरिक पदवी शिक्षणाला पूर्णपणे नाकारणे असा होत नाही. मूलभूत संशोधन, विज्ञान, साहित्य, तत्त्वज्ञान यांसारख्या क्षेत्रांसाठी पदवी शिक्षणाचे महत्त्व कायम आहे आणि राहील. परंतु, प्रश्न असा आहे की उच्च शिक्षणाचा लाभ घेणारा प्रत्येक तरुण संशोधक किंवा शास्त्रज्ञ बनणार नाही. जे तरुण सरसकट पदवी घेऊन नोकरीच्या बाजारात उतरतात, त्यांना जर उपजीविकेचे साधन मिळवायचे असेल, तर पदवीसोबत किंवा पदवीऐवजी कौशल्य जोडणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील अनेक विकसित देशांनी व्यावसायिक शिक्षणाला आपल्या प्राथमिक शिक्षण प्रणालीचा मुख्य भाग बनवले आहे. जर्मनी, जपान किंवा दक्षिण कोरिया यांसारख्या देशांमध्ये व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक मान दिला जातो आणि त्यांना उद्योगांमध्ये त्वरित सामावून घेतले जाते. भारतालाही याच मार्गाने वेगाने पावले टाकावी लागतील.

आपल्या देशात अजूनही व्यावसायिक शिक्षणाकडे दुय्यम दर्जाचे शिक्षण म्हणून पाहिले जाण्याची जुनी मानसिकता पूर्णपणे संपलेली नाही. ही मानसिकता बदलण्याची तीव्र गरज आहे. कौशल्य हाच आजच्या काळात अंतिम परवाना आहे. ज्याच्याकडे कौशल्य आहे, त्याला नोकरी किंवा व्यवसायाच्या संधीसाठी कोणाचे उंबरठे झिजवावे लागत नाहीत. शैक्षणिक संस्था आणि उद्योग जगताने एकत्र येऊन अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत, जेणेकरून विद्यार्थ्यांना शिकत असतानाच प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येईल. इन्टर्नशिप आणि प्रॅक्टिकल ट्रेनिंग या शिक्षण पद्धतीचा कणा बनल्या पाहिजेत.

थोडक्यात सांगायचे तर, पारंपारिक पदव्यांचे कागद आता तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यास तोकडे पडत आहेत. भविष्यातील भारत जर एकात्मिक आणि बलशाली बनवायचा असेल, तर शिक्षणाला हुशारीच्या ऐवजी कार्यक्षमतेची जोड द्यावी लागेल. पदवीच्या चौकटीतून बाहेर पडून कौशल्याच्या नव्या वाऱ्यावर चालणे हाच प्रगतीचा राजमार्ग आहे. जो देश किंवा समाज आपल्या तरुण पिढीला योग्य वेळी योग्य कौशल्य देईल, तोच येत्या काळात जगाचे नेतृत्व करेल यात शंका नाही. त्यामुळे शिक्षणाचा मुख्य प्रवाह हा आता कौशल्याधारित शिक्षणाकडे वळवणे ही काळाची गरज आणि ऐतिहासिक पाऊल ठरेल.

## विशेष

उदयराज साऊळ

# विचारांची शाश्वत ज्योत आणि राष्ट्रनिर्मितीचे दोन खांब

**ऑक्टोबर महिन्याचा दुसरा दिवस हा भारतीय इतिहासातील अत्यंत पवित्र, प्रेरणादायी आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध असा सुवर्णदिन मानला जातो. याच दिवशी दोन महान विभूतींनी या भूमीवर जन्म घेतला, ज्यांनी स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. मोहनदास करमचंद गांधी (महात्मा गांधी) आणि भारताचे दुसरे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त केवळ त्यांच्या प्रतिमेला आदरांजली वाहणे औपचारिकता ठरेल; तर त्यांच्या विचारांचे आणि मूल्यांचे पुनरावलोकन करणे आजच्या काळात अधिक गरजेचे आहे. हे दोघेही महामानव वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आले होते, परंतु दोघांचे ध्येय एकच होतेभारतभूमीला स्वावलंबी, नैतिकदृष्ट्या बलवान आणि स्वयंपूर्ण बनवणे.**

महात्मा गांधी हे केवळ एका व्यक्तीचे नाव नसून ते एक विचारप्रणाली आहेत. ज्या युगात जगावर तलवारीची आणि सत्तेची मस्ती चढली होती, त्या काळात गांधीजींनी सत्याग्रह आणि अहिंसेचा नवा मार्ग संपूर्ण जगाला दाखवला. त्यांचे जीवन म्हणजेच एक प्रयोग होते, ज्यातून त्यांनी सत्य आणि नैतिकतेची कास कधीही सोडली नाही. आजच्या भौतिकवादी आणि स्पर्धात्मक युगात मानवी मूल्ये झपाट्याने रसातळाला जात आहेत. अशा वेळी गांधीजींचे विचार आपल्याला एका नव्या प्रकाशाची दिशा दाखवतात. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना ही आजच्या ग्रामीण भारताच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जोपर्यंत खेडी स्वावलंबी होत नाहीत, तोपर्यंत देशाचा खरा विकास होऊ शकत नाही, हे त्यांचे सत्य आजच्या काळात प्रकर्षाने जाणवते. स्वच्छता हा त्यांच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. स्वच्छता हीच सेवा हा केवळ एक नारा नसून तो जीवन जगण्याचा स्थायीभाव बनला पाहिजे, हे गांधीजींनी आपल्याला शिकवले. आजच्या काळात जेव्हा पर्यावरण ऱ्हास आणि प्रदूषण ही जागतिक समस्या बनली आहे, तेव्हा गांधीजींचे निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचे आणि मर्यादित गरजांमध्ये जगण्याचे तत्त्वज्ञान अधिक समर्पक ठरते. त्यांचे राजकीय विचार केवळ स्वातंत्र्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते सामाजिक सलोखा, सर्वधर्म समभाव आणि तळागाळातील शेवटच्या माणसाचा विकास यावर आधारलेले होते.

दुसरीकडे, लाल बहादूर शास्त्री हे भारताच्या राजकीय पटलावर साधेपणा, प्रामाणिकपणा आणि दृढनिश्चयाचे उत्तम प्रतीक म्हणून चमकले. त्यांचे जीवन म्हणजे साद जीवन उच्च विचार या सुवचनाचे उत्तम मूर्तिमंत रूप होते. गरिबीच्या छायेत लहानाचे मोठे झालेले शास्त्रीजी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले, परंतु त्यांच्या साधेपणाला कधीही तडा गेला नाही. त्यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची धुरा सांभाळली तेव्हा भारतासमोर भीषण अन्नधान्याची टंचाई आणि पाकिस्तानचे आक्रमण अशी दुहेरी संकटे होती. १९६५ च्या भारत-पाक युद्धात त्यांनी ज्या कणखर नेतृत्वाचा परिचय दिला, त्याने संपूर्ण देशाला एका सूत्रात बांधले. सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी त्यांनी दिलेली जय जवान, जय किसान ही घोषणा केवळ घोषणा राहिली नाही, तर ती भारताच्या आत्मसन्मानाची आणि कृषी संस्कृतीची मानचिन्ह बनली. आज भारत कृषी क्षेत्रात आणि अन्न सुरक्षेत स्वावलंबी आहे, त्याच्या पायात शास्त्रीजींचे दूरदर्शी नेतृत्व आणि शेतकर्यांप्रती असलेला आदर आहे. जेव्हा देशात अन्नधान्याचा तुटवडा होता, तेव्हा जनतेला एका वेळचे जेवण सोडण्याचे आवाहन करताना त्यांनी स्वतः आपल्या घरी चूल पेटवली नाही. अशी नैतिकता आणि कृतकृतेचे पालन करणारे नेते आजच्या राजकारणात दुर्मिळ होत चालले आहेत.

गांधीजी आणि शास्त्रीजी यांच्यात एक अचूक आणि सुंदर साम्य होते, ते म्हणजे त्यांची



अफाट जनमानसाशी असलेली नाळ आणि नम्रता. गांधीजींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, तर शास्त्रीजींनी त्या स्वातंत्र्याचे रक्षण कसे करावे आणि स्वाभिमानाने कसे जगावे, हे कृतीतून दाखवून दिले.

आज जेव्हा आपण या दोन्ही नेत्यांचे स्मरण करतो, तेव्हा आपल्यासमोर अनेक प्रश्न उभे ठाकतात. आपण त्यांच्या विचारांवर कितपत चालत आहोत? आजची तरुण पिढी भ्रष्टाचारी प्रवृत्ती, तात्कालिक यश आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीच्या मागे धावत असताना, या महापुरुषांचा साधेपणा, त्याग आणि देशप्रेम कुठे हरवत चालले आहे का? हा गंभीर आत्मचिंतनाचा विषय आहे. आज देशात भ्रष्टाचार, हिंसाचार, प्रादेशिक व धार्मिक असहिष्णुता वाढत आहे. या समस्यांवर मात करण्यासाठी गांधीजींची अहिंसा आणि शास्त्रीजींची प्रामाणिक निष्ठा यांच्याशिवाय दुसरा कोणताही प्रभावी उपाय नाही.

आपण एक प्रगत आणि आधुनिक राष्ट्र म्हणून पुढे जात असताना, तंत्रज्ञानात मोठी झेप घेत असताना, आपल्या नैतिक पायाला विसरून चालणार नाही. गांधीजींच्या विचारांमधील सहिष्णुता, सत्याचा आग्रह आणि शास्त्रीजींच्या विचारांमधील कर्तृत्व, राष्ट्रनिष्ठा आणि निस्सीम देशप्रेम यांचा संगम साधणे हीच खरी या दोन्ही महापुरुषांना आदरांजली ठरेल. आजच्या तरुण पिढीने केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आचार आणि विचारांमध्ये या दोन्ही महान नेत्यांच्या मूल्यांचा अंगीकार करणे काळाची गरज आहे. जेव्हा देशातील प्रत्येक नागरिक स्वतःला गांधीजींच्या विचारांचा आणि शास्त्रीजींच्या कर्तृत्वाचा पाईक मानेल, तेव्हाच खऱ्या अर्थाने एका सुजलाम, सुफलाम आणि समृद्ध भारताची निर्मिती होईल, ज्याचे स्वप्न या दोन्ही दिग्गजांनी पाहिले होते.

आजच्या या पावनदिनी आपण सर्वजण हा संकल्प करूया की, आपल्या दैनंदिन जीवनात सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा आणि साधेपणा या मूल्यांचा संवर्धन करू. देशाच्या प्रगतीत आपले खारीचा वाटा उचलू आणि या दोन महान विभूतींनी दाखवलेल्या मार्गावर चालत भारताला विश्वगुरू बनवण्याच्या दिशेने आपली पावले भक्कमपणे पुढे टाकू.

## चित्ररंग



शरद कोरडे
मो. ९३७११८५१७४

# अरुण कर्नाटकी

## एक अनुभवी जाणता दिग्दर्शक!



**मराठी चित्रपटसृष्टीवर तीन दशके आपल्या कर्तृत्वाची आणि दिग्दर्शनाची भक्कम छाप सोडणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे अरुण कर्नाटकी. चित्रपट घराण्याचा समृद्ध वारसा लाभलेले अरुणदादा हे केवळ उत्कृष्ट दिग्दर्शकच नव्हते, तर दादा कोंडके यांच्या सुपरहिट चित्रपटांचे खरेखुरे शिल्पकार होते. सेटवरील शिस्त, कामावरील निष्ठा आणि निर्मिकांची काळजी वाहणारा दिलदार माणूस म्हणून त्यांची ओळख होती. चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गजांचा सहवास लाभलेल्या आणि मराठी चित्रपटविश्वाला एका उंचीवर नेणाऱ्या या हरहुन्नरी दिग्दर्शकाच्या जीवनप्रवासाचा आणि आठवणींचा एक अंतरंग उलगडणारा हा विशेष लेख...**

१८ सप्टेंबर १९९९ हा दिग्दर्शक अरुण कर्नाटकी यांचा स्मृतिदिन. भारतीय चित्रपटांच्या सुरुवातीच्या काळातले नामवंत छायाचित्रकार वासुदेव कर्नाटकी यांचे ते वडील. (टीप: मूळ मजकुराप्रमाणे ठेवले आहे) ते ख्यातनाम कॅमेरामन होते. १९३० ते १९६० या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक चित्रपटांचे चित्रीकरण केले. चित्रमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या गंगावतरण या १९३७ सालच्या चित्रपटाचे ते कॅमेरामन होते. त्यांनी पंचरत्न - १९५६ व अच्चनुम - १९५७ सालच्या मल्याळम चित्रपटाचेही चित्रीकरण केले होते. घरातून आणि कुटुंबातून चित्रपटनिर्मितीचा वारसा मिळालेले अरुण यांचे मास्टर विनायक हे काका होते. भालजी पेंढारकर, बाबुराव पेंढारकर व व्ही. शांताराम हे जवळचे आप्त होते. त्यामुळे कोल्हापुरातील सांस्कृतिक वातावरणाचे धडे त्यांना लहानपणापासून मिळाले. चित्रपटक्षेत्रातील त्यांचे पहिले गुरू मास्टर विनायक हे होते. अरुण कर्नाटकी यांचा जन्म कोल्हापूरजवळील येळगुळ येथे ४ ऑक्टोबर १९३२ रोजी झाला. मास्टर विनायक यांच्या ओळखीने त्यांना दाक्षिणात्य अभिनेते शिवाजी गणेशन, जेमिनी गणेशन व बी. सरोजादेवी या कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाली. त्यातच भालजी पेंढारकर व व्ही. शांताराम यांच्या हाताखाली त्यांनी काम केले. भालजींचे शिष्य राजा परांजपे यांनी पाठलाग व पडछाया या चित्रपटासाठी त्यांना सहाय्यक दिग्दर्शक म्हणून घेतले. पुढे दत्ता धर्माधिकारी, राजदत्त व सदाशिव रावकवी यांच्यासोबत काम करून त्यांनी दिग्दर्शनाचे बारकावे जाणून घेतले. हे सुरू असतानाच त्यांनी काही चित्रपटांतून छोट्या छोट्या भूमिकाही केल्या. १९७६ च्या जवळ ये लाजू नको या चित्रपटाला त्यांनी स्वतंत्रपणे दिग्दर्शन केले. हा चित्रपट विजयानंद चित्राची निर्मिती होती. यात अशोक सराफ, उषा नाईक, गणपत पाटील यांच्या भूमिका होत्या. हलकीफुलकी विनोदी मांडणी व रंगतदार संवाद यामुळे हा चित्रपट यशस्वी झाला. पुढे अरुण कर्नाटकी यांनी रानपाखरं, घर जावई, पायगुण, आली लहर केला कहर, चव्हाटा, धोंडी धोंडी पाणी दे, बंदीवान मी संसारी, लपवाछपवी, डोक्याला ताप नाही, अपराधी, सारेच सज्जन या चित्रपटांचे दिग्दर्शन करून मराठी चित्रपटसृष्टीत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले.

अभिनत्री लता अरुण ही त्यांची पत्नी व निर्माता-अभिनेता शहाजी काळे यांची बहीण होती. माया जाधव या प्रिया अरुण (आताच्या प्रिया बेर्डे) यांच्या मामी. अभिनेत्री नंदा या अरुणदादांच्या चुलत बहीण व दिग्दर्शक जयप्रकाश कर्नाटकी हे त्यांचे चुलत भाऊ आणि जयश्री टी. ही त्यांची वहिनी, असा मोठा चित्रपटक्षेत्रातील गोतावळा अरुण कर्नाटकी यांच्या सभोवती होता. लक्ष्मीकांत बेर्डे हा त्यांचा जावई व अभिनय, स्वानंदी बेर्डे ही नातवंडे, जी नाट्य-चित्रपटांतून आपला वारसा जपत आहेत.

माझे ठाण्याचे मित्र नरेंद्र कुमार जोशी यांच्या अपराधी या चित्रपटाच्या निर्मितीच्या वेळी नरेंद्र, अरुण कर्नाटकींसह अलिबागजवळील लोकेशन पाहायला आला होता. त्यावेळी प्रथम अरुणजींचा माझा परिचय झाला. अपराधीमध्ये लक्ष्मीकांत बेर्डे, विजय चव्हाण, कुलदीप पवार, रवी पटवर्धन, सुनिता गोरे, रुही बेर्डे आदी कलाकार काम करीत होते. या चित्रपटात प्रथमच प्रिया अरुण यांनी तिहेरी भूमिका केली होती. यातील कोळीवाडा हा भाग थळ-चाळमळा येथे चित्रित करण्यात आला होता. समुद्रकिनारी व समुद्रात होडीमध्ये यातील दोन गाणी व नृत्येही चित्रित करण्यात आली होती. हिंदीमधील प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक मनोहर नायडू यांनी या गाण्यांचे नृत्यदिग्दर्शन केले होते. या चित्रपटामुळे व नरेंद्रच्या मैत्रीमुळे मला अरुण कर्नाटकी यांच्यासोबत त्यांचा सहाय्यक म्हणून काम करायची संधी मिळाली. त्यामुळे त्यांची मैत्रीही झाली.



अरुणदादा यांची कामाची पद्धत वेगळी होती. सेटवर ते एक क्षणही वाया घालवीत नसत. कामात चुकारपणा केल्यास ते कुणालाही रागावत असत. सेटवर टेकिंग करताना ते अचूकपणे कॅमेरा लावत असत व जलद गतीने काम उरकण्याकडे त्यांचा कल असे. सेटवर खेळकरपणा व विनोद करण्याची त्यांना आवड असे. इतकेच नव्हे तर कलाकारांना चित्रीकरणाच्या वेळी कशा प्रकारचे जेवण द्यावे, याकडेही त्यांचा कटाक्ष असे. कोणालाही अपाय होईल असे पदार्थ ते टाळायला लावत असत.

दादा कोंडके यांच्या अनेक गाजलेल्या चित्रपटांसाठी अरुण कर्नाटकी यांनी सहाय्यक दिग्दर्शन केले होते. प्रत्यक्षात अरुण कर्नाटकीच दिग्दर्शनाची सारी जबाबदारी घेत असत, पण श्रेयनामावलीत दिग्दर्शक म्हणून दादा कोंडकेंचे नाव असे. पांडू हवलदार या १९७५ च्या चित्रपटापासून तुमचं आमचं जमलं, राम राम गंगाराम, बोट लावीन तिथे गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, मला घेऊन चला, पळवा पळवी, सासरचे धोतर व वाजवू का? या १९९६ सालच्या चित्रपटांपर्यंत अरुणजींनी दादांसोबत काम केले. वाजवू का या चित्रपटाच्या वेळी अरुणजींसोबत दादांच्या गावी इंगवली येथे एक महिना राहण्याची मला संधी मिळाली. तिथे मला जवळून अरुणजींची व दादांची कामाची पद्धत पाहण्याची व शिकण्याची संधी मिळाली. अरुणजींचा दादांच्या ग्रुपमध्ये मोठा दरारा असे. सारे आदराने त्यांच्याशी वागत असत. दादांचा त्यांच्यावर खूप विश्वास होता, हे मी जवळून पाहिले. कोल्हापूरच्या नटमंडळींशी, विशेषतः भालचंद्र कुलकर्णी, आशा पाटील, दिनकर इनामदार, अलका इनामदार, जगन्नाथ पसाले व मधु गायकवाड या कलाकारांशी त्यांचा चांगला स्नेह जुळला. या चित्रपटात मी एक छोटीशी भूमिकाही केली. माझ्या आयुष्यातील हा एक अविस्मरणीय अनुभव होता.

अरुण कर्नाटकी यांनी दादांच्या तेरे मेरे बीच में या हिंदी चित्रपटाचेही सहाय्यक दिग्दर्शन केले होते. अरुणजींनी विविध शैलीचे चित्रपट दिग्दर्शित केले व मराठी चित्रपटसृष्टीत दीर्घकाळ अधिसत्ता गाजवली. त्यांचा रांगडेपणा, दिलदारपणा व कामावरील श्रद्धा, तसेच निर्मात्यांना सांभाळून त्यांना कुठल्याही अनावश्यक खर्चापासून अलिप्त ठेवण्याची किमिया अरुण कर्नाटकी यांच्याकडे होती. त्यांच्या या गुणांमुळे त्यांनी चित्रपटसृष्टीवर तीन दशके प्रभुत्व गाजवले. चित्रीकरण आटोपल्यावर ते संध्याकाळनंतर ''पॅक अप'' ची घोषणा देत असत व आपल्या निवासात जात असत. त्यानंतर मात्र चित्रपटाच्या कुठल्याही चर्चेपासून व विचारविनिमयापासून ते अलिप्त राहत असत. तसेच कुठलाही निर्माता त्यांना पॅकअप नंतर चर्चेसाठी बोलावण्यास धजत नसत. याबाबत त्यांची स्वतःची एक धारणा होती व त्यात ते तडजोड करीत नसत. कोल्हापूर येथे वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपटसृष्टी दुःखसागरात बुडाली. हा चित्रपट आजही रसिक आवर्जून पाहतात.

# नजरेतील भाव आणि संवाद

मानवी भावभावनांचा अथांग समुद्र आणि त्यात उमटणाऱ्या लहरी म्हणजेच डोळे, ज्यांना आपण प्रेमाने नजर म्हणतो. अफाट विश्वासाची वीण घट्ट करणारी ही नजर केवळ पाहण्याचे एक इंद्रिय नाही, तर ती मानवी आत्म्याची आरसा आहे, जिथून शब्दांशिवाय संवाद साधला जातो. कोणत्याही भाषेची गरज न भासता केवळ एका दृष्टिक्षेपात हजारो गोष्टी सांगण्याचे विलक्षण सामर्थ्य नजरेमध्ये दडलेले असते.

जन्माला आलेल्या बालकापासून ते अखेरच्या घटका मोजणाऱ्या वृद्धापर्यंत, प्रत्येक माणसाची नजर ही त्याच्या जगण्याचा आरसा असते. लहान मुलांची नजर अगदी निर्मळ, निष्पाप आणि जगाच्या कपटकारस्थानांपासून दूर असते. त्यांच्या नजरेतील कुतूहल बघणाऱ्याच्या मनाला भुरळ पाडते. जसे-जसे आयुष्य पुढे सरकते, तसे-तसे अनुभवांच्या शिदोरीमुळे या नजरेचे रंग बदलत जातात. प्रेमात पडलेल्या तरुण-तरुणींची नजर जशी लाजून चूर असते, तसेच कठीण प्रसंगांना आणि संकटांचा सामना करणाऱ्या योद्ध्याच्या डोळ्यात एक वेगळाच विडा आणि जिद्द चमकत असते.

नजर ही जादूई आहे कारण ती कधी कुणाला घायाळ करू शकते तर कधी विझलेल्या दिव्याला पुन्हा प्रज्वलित करू शकते. आईच्या नजरेत लेकरासाठी असलेली ममता आणि काळजी जगातील कोणत्याही औषधापेक्षा जास्त गुणकारी ठरते. जेव्हा ती आपल्या बाळाला प्रेमाने पाहते, तेव्हा त्या नजरेतील शीतलता साऱ्या संकटांना दूर पळवते. याउलट, समाजात द्वेष, राग आणि तिरस्कार पसरवणारी नजर देखील अस्तित्वात असते, जी माणसाला आतून तोडून टाकते. म्हणूनच संतांनी आणि महापुरुषांनी नेहमीच आपली नजर शुद्ध आणि सकारात्मक ठेवण्याचा उपदेश केला आहे.

कलेच्या प्रांतातही नजरेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. चित्रकार आपल्या कुंचल्याच्या एका फटक्याने कॅनव्हासवर उतरवलेल्या पात्रांच्या डोळ्यात भाव निर्माण करतो, तेव्हा ती चित्रकृती जिवंत भासू लागते. एका साध्याशा नजरेतून कवी हजारो ओळींची कविता रचू शकतो. नृत्यात तर नजरेचा कटाक्ष संपूर्ण मुद्रेचा अर्थ बदलून टाकतो. भावराणीच्या विविध छटांचा हा सुंदर आविष्कार डोळ्यांच्या या लपंडावातूनच जीवनाचे खरे सौंदर्य उलगडत जाते.

ही नजर म्हणजे मानवी अस्तित्वाची सर्वात सुंदर ओळख आहे. ती केवळ बाह्य जग बघत नाही, तर आतल्या विश्वाचे दर्शन घडवते. आपली नजर जितकी सुंदर, विशाल आणि प्रेमळ असेल, तितकेच आपल्याला हे संपूर्ण विश्व सुदंर आणि आशेने भरलेले भासेल. म्हणूनच, आपल्या नजरेला प्रेमाचा, आपुलकीचा आणि आदराचा लेप देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने मानवी जीवन समृद्ध करणे होय.

**-संजय पारंगे**

## पुस्तक परिचय



प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

# जीवनयात्रा आनंदाची..
# तिमिरातुनी तेजाकडे

**कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी लढा देत त्यातून नवी उमेद शोधणाऱ्या ॲड. स्वाती कुलकर्णी यांच्या 'तिमिरातुनी तेजाकडे' या पुस्तकाचा परिचय करून देताना, प्रा. शाम जोगळेकर यांनी एका संवेदनशील साहित्यिकाची आणि मार्गदर्शकाची भूमिका अत्यंत प्रभावीपणे वठवली आहे. प्रा. जोगळेकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीतून पुस्तकातील प्रत्येक प्रकरणाचा गाभा, संघर्ष आणि त्यामागील सकारात्मक ऊर्जा वाचकांसमोर उलगडून दाखवली आहे. केवळ पुस्तकाचे परीक्षण न करता, त्यातील मानवतावादी दृष्टिकोन आणि समाजभान त्यांनी अत्यंत नेमकेपणाने टिपले आहे. एका ज्येष्ठ आणि व्यासंगी प्राध्यापकाची सुसंस्कृत, प्रेरणादायी आणि चिकित्सक नजर या संपूर्ण पुस्तक परिचयातून स्पष्टपणे जाणवते.**

**-संपादक**

'तिमिरातुनी तेजाकडे' हे ॲड. स्वाती कुलकर्णी यांचे पुस्तक संजय कुलकर्णी यांनी प्रकाशित केले आहे. मनोगतमध्ये स्वाती यांनी आपल्या पहिल्या पुस्तकाची निर्मिती कशी झाली, हे सविस्तरपणे मांडले आहे. एप्रिल,२ ०२२ मध्ये त्यांच्या टॉन्सिल्सच्या कॅन्सरचे निदान झाले. कॅन्सरमधून बऱ्या होण्याच्या, या खडतर प्रवासाचा मागोवा पुस्तकात घेतला आहे. नांदेडचे सुप्रसिद्ध, डॉ. नंदू मुलमुले यांनी हे पुस्तक वाचून आपला समर्पक अभिप्राय दिला आहे. त्यानुसार, त्यांचा प्रांजळपणा, त्यांच्या स्वभावाला असलेली नर्मविनोदाची डूब, कॅन्सरच्या उपचारात त्यांच्या वाट्याला आलेले अनुभव आणि त्यावेळी जाणवलेली चिंता, भीती, काळजी, औदासिन्य त्यावर मनाने काढलेला मार्ग, सारे काही त्या प्रांजळपणे कथन करतात.

जीवनाकडे नर्मविनोदी खेळकर वृत्तीने पाहण्याच्या त्यांच्या वृत्तीचे त्यांनी कौतुक केले आहे. बारा प्रकरणांतून पुस्तक वाचकांसमोर उलगडते. अद्वैत कुलकर्णी यांचे रंगीत मुखपृष्ठ समर्पक आहे. सलिल थिटे यांची पुस्तकातील समाविष्ट, रेखाचित्रे उत्तम झाली आहेत.

'आज अचानक गाठ दिसे' या पहिल्या प्रकरणात, कोर्टातील कामाचे टायपिंग करायला, ॲड. स्वाती गेल्या होत्या. त्यावेळी, २९ मार्च २०२२ रोजी त्यांना, गळ्याखाली घट्ट, गोलाकार, बोराएवढी गाठ असल्याचे जाणवले. न दुखणारी गाठ डॉक्टरना दाखवण्यास सुरुवात झाली. विविध तपासण्यानंतर गाठ काढली गेली. त्या गाठीची तपासणी केल्यानंतर विविध रिपोर्ट आले. अंतिम रिपोर्ट कॅन्सर नसल्याचा येईल, असे सर्वांना वाटत होते. परंतु जेव्हा त्याविषयी घरातील कोणी बोलत नव्हते, तेव्हा स्वाती यांना काळजी वाटू लागली. कॅन्सर झाल्याचे समजल्यानंतर, वयाच्या ५४ व्या वर्षी, मरण येईल की काय, असे वाटायला लागले. स्वाती यांच्या मनात विचारचक्र सुरू झाले. कॅन्सरचे ऑपरेशन मुंबईतील कुलाबा येथील एच.सी.जी. खुबचंदानी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये करण्याचे, कुटुंबीयांनी निश्चित केले. त्याप्रमाणे २३ मे रोजी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतरचे विविध अनुभव स्वाती यांनी 'तुम आशा विश्वास हो हमारे' या प्रकरणात सविस्तरपणे मांडले आहेत. आतापर्यंतच्या जीवनाविषयी वाटलेले समाधान त्यांनी नेमकेपणाने व्यक्त केले आहे. कॅन्सरवर मात केल्यानंतर, पुन्हा नव्याने जीवन सुरू होईल, अशी आशा त्यांना वाटत होती. 'हम होंगे कामयाब एक दिन' या प्रकरणामध्ये रेडिएशन, केमोथेरपी घेताना आलेले, विविध अनुभव स्वाती यांनी, सविस्तरपणे, समर्पक शब्दात मांडले आहेत. ते वाचताना आधुनिक वैद्यकशास्त्राची प्रगती आणि आजारातून बरे होऊ पाहणाऱ्या रुग्णांना सहन करावे लागणारे कष्ट, वेदना हे जाणवते. ते वाचताना डोळे नकळत पाझरू लागतात.

'मनका विश्वास कमजोर हो ना' या प्रकरणात कॅन्सरविषयी स्वाती यांनी सविस्तरपणे लिहिले आहे. कॅन्सर म्हणजे मृत्यू, हे बहुतेकांच्या मनात पक्के असते. त्यामुळे रुग्णाबरोबरच नातेवाईक आणि मित्रपरिवार घाबरून जातो. परंतु अत्याधुनिक वैद्यकीय संशोधनातून केमोथेरपी, रेडिएशन यांचा प्रभावी उपाय असल्याने, कॅन्सर रुग्ण बरे होऊ शकतात. मात्र ही सारी प्रक्रिया खर्चिक आणि रुग्णांप्रमाणेच त्यांच्या नातेवाईकांना थकवणारी असते. कॅन्सर हा आजार कोणालाही केव्हाही होऊ शकतो. ॲड.ॲड. पोषक आहाराचा अभाव, चुकीची आहारपद्धती, तंबाखू, गुटखा सेवन, धूम्रपान, मद्यपान, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, काही घातक रसायनांच्या संपर्कात राहणे अशा विविध कारणांमुळे कॅन्सरची शक्यता वाढते. कॅन्सर रुग्णांच्या बाबतीत वैद्यकीय उपचारांप्रमाणेच, मानसिक आरोग्य टिकविण्यासाठी काळजी घ्यावी लागते. कॅन्सरचे हॉस्पिटलमधील उपचार संपल्यानंतर, घरी आल्यावर पती, मुलगा आणि जवळचे नातेवाईक, मित्रपरिवार यांनी खाण्यापिण्याकडे, शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे कसे लक्ष पुरविले, ते सविस्तरपणे मांडले आहे. 'हार के बाद ही जीत है' मध्ये, स्वाती यांनी, मे २०२३ नंतर, हळूहळू सर्व दैनंदिन व्यवहार, तब्येत सुधारल्यामुळे कसे करता येऊ लागले, ते स्पष्ट केले आहे. श्रावणात अलिबागच्या मनस्विनी या स्त्रियांच्या गटातील मंगळागौरीच्या कार्यक्रमात त्यांनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या निवेदनाबरोबरच त्यांचे गाणेही छान झाले. परिणामी राज्यव्यापी स्पर्धेमध्ये, मुंबईला त्यांच्या गटाला दुसरे पारितोषिक प्राप्त झाले. त्याआधी त्यांनी पंढरपूरच्या वारीमध्ये आपला सहभाग, अंशतः नोंदविला होता. नंतर गणपतीचा सण, त्यांच्या घरी सर्व नातेवाईकांसह साजरा झाला.




कॅन्सर म्हणजे जीवनमरणाची लढाई समजली जाते. त्यामुळे आधुनिक वैद्यकीय उपचारांप्रमाणेच, अन्य वैद्यकीय उपायही रुग्ण घेण्यास उद्युक्त होतो. स्वाती यांनी आयुर्वेदतज्ज्ञ यांनी सुचविलेली औषधे घेतली होती. रेकीचा आधारही घेतला होता. परिशिष्टामध्ये स्वाती यांनी 'आधार रेखा प्रतिष्ठान' या सेवाभावी संस्थेची सविस्तर माहिती दिली आहे. भावी काळात या संस्थेला मदत करण्याचा त्यांनी संकल्प केला आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाला कॅन्सरच्या आजाराचा मुकाबला करण्यासाठी लागणारा मोठा खर्च झेपणारा नसतो. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांसाठी, सरकार तसेच विविध समाजसेवी संस्था मदत करतात. अशा सेवाभावी संस्थांना आर्थिक आणि अन्य प्रकारची, यथाशक्य मदत करणे, हे सर्व सुजाण नागरिकांचे कर्तव्य आहे, याचीही जाणीव स्वाती यांनी करून दिली आहे.

स्वाती यांनी या पुस्तकाद्वारे कॅन्सरशी लढा देतानाचे सविस्तर अनुभव विलक्षण पद्धतीने, जीवनाविषयी खेळकर दृष्टिकोन ठेवून मांडल्यामुळे हे पुस्तक नितांत वाचनीय आणि संग्राह्य ठरते. साहित्य, संगीत आणि विनोदाच्या आधाराने रुग्णाचे मानसिक आरोग्य सुधारण्यास कशी मदत होते, हे या पुस्तकाद्वारे समजते. स्वाती यांनी कॅन्सरच्या ज्ञात इतिहासाचा, पुस्तकात उल्लेख करायला हवा होता. या पुस्तकाच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न, कॅन्सरसंबंधी विधायक कार्य करणाऱ्या 'आधार रेखा प्रतिष्ठान, ठाणे' या सेवाभावी संस्थेला देण्याचा संकल्प त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे, हे विशेष!

**पुस्तकाचे नाव : तिमिरातुनी तेजाकडे**
**लेखिका : ॲड. स्वाती कुलकर्णी**
**प्रथम आवृत्ती : २०२६**
**प्रकाशक : संजय कुलकर्णी, अलिबाग.**
**९४२००५६६८८**
**पृष्ठे १८७. मूल्य रु. ३५०/-**

# रायगड जिल्हा परिषदेतर्फे ५० आशा स्वयंसेविकांचा सन्मान

## आयुष्मान भारत कार्ड निर्मितीचे १०० टक्के उद्दिष्ट केले पूर्ण

**अलिबाग, कोकणनामा वृत्त- रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने नुकताच २०२६-२७ मध्ये आयुष्मान भारत कार्ड निर्मितीचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ५० आशा स्वयंसेविकांचा सन्मान राजिप उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. त्याचप्रमाणे विविध पुरस्कारप्राप्त आरोग्य केंद्रांचाही सन्मान करण्यात आला.**

यावेळी उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी मार्गदर्शन करताना, ‘‘आरोग्य विभागाने सातत्याने सतर्क राहून काम करावे. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावा. जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉक्टरांचाही सन्मान केला जाईल,‘‘ असे सांगितले.

रायगड जिल्हा परिषद आरोग्य समितीची सभा नुकतीच उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेसाठी जि.प. सदस्य उषा ठोंबरे, सदस्य नेहा पारंगे, सदस्य शर्मिला बोडके, सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, सदस्य दिशा जाधव, सदस्य मन्सूर ताज,



खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, मुरुड पंचायत समिती सभापती निलेश घटवळ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, सहायक आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी, पुरस्कारप्राप्त आरोग्य केंद्रांचे प्रतिनिधी आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

या सभेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी यांनी ‘तिशीचा पल्ला.. तपासणी अन् सल्ला’ या अभियानाची सविस्तर माहिती दिली. तसेच, ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ अभियानाबाबत आढावा घेण्यात आला. २०२६-२७ मध्ये आयुष्मान भारत कार्ड निर्मितीचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ५० आशा स्वयंसेविकांचा सन्मान राजिप उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. यानंतर, रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात आपल्या सेवाकाळात अत्यंत निष्ठा व प्रामाणिकपणे काम केल्याबद्दल तीन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचाही गौरव मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

**पुरस्कारप्राप्त आरोग्य केंद्रांचाही गौरव**

राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकनामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र चिखलीने राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल राज्यात प्रथम क्रमांक पटकावला. याशिवाय, उपकेंद्र खंडाळे (प्रा.आ. केंद्र पोयनाड) राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल, उपकेंद्र धामणी (प्रा.आ. केंद्र नेरे) राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आणि उपकेंद्र देवळी (प्रा.आ. केंद्र गोरेगाव) राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल गौरविण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळणार हक्काचे व्यासपीठ

## शाळा क्रमांक १ व २ येथे रंगमंच; प्रशांत नाईक यांच्या हस्ते रंगमंचाच्या कामाचे भूमिपूजन

**अलिबाग, कोकणनामा वृत्त- अलिबाग नगरपरिषदेच्या हद्दीतील मराठी शाळा क्रमांक १ व २ येथील विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे सुसज्ज व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता शाळेच्या परिसरात प्रस्तावित रंगमंच व शेडच्या बांधकामाचे भूमिपूजन वीज व बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.**




नगरपरिषदेच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेल्या या कामासाठी सुमारे ३० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. शाळेच्या आवारात रंगमंच उभारला जाणार असल्याने विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलने, वक्तृत्व, नृत्य, नाट्य तसेच शालेय उपक्रमांसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये या कामाची भर पडणार आहे.

हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानातून हे काम पार पडणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळेच्या पायाभूत सुविधेत ही महत्त्वाची भर पडत असून, विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ वर्गखोल्या पुरेशा नसून त्यांना आपले कलागुण सादर करण्यासाठी योग्य व्यासपीठही आवश्यक असते, या भूमिकेतून या कामाकडे पाहिले जात आहे. प्रशांत नाईक यांच्या पुढाकारातून शाळेच्या गरजा आणि विद्यार्थ्यांच्या सोयी लक्षात घेऊन सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात असल्याचे यावेळी दिसून आले.

या कामासाठीचा ठराव, अंदाजपत्रकीय प्रक्रिया आणि नगरपरिषदेच्या प्रशासकीय मंजुरीनंतर प्रत्यक्ष बांधकामाचा टप्पा सुरू झाला आहे. शाळेच्या परिसरातील उपलब्ध जागेचा विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी अधिक प्रभावीपणे वापर करण्याच्या दृष्टीने रंगमंच आणि शेडची सुविधा महत्त्वाची ठरणार आहे.

भूमिपूजनप्रसंगी नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, अश्विनी ठोसर, नीलम हजारे, निवेदिता वाघमारे, योजना पाटील, जमाल सय्यद, ॲड. अंकित बंगेरा, नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी, शाळेतील शिक्षक, पालक आणि नागरिक उपस्थित होते. शहरातील सार्वजनिक सुविधांसोबतच शैक्षणिक संस्थांच्या मूलभूत गरजांकडेही लक्ष देत विकासकामे पुढे नेण्याचा प्रशांत नाईक यांचा प्रयत्न या निमित्ताने अधोरेखित झाला.

# रा. जि. मुख्याध्यापक संघटनेची वार्षिक सभा



**अलिबाग, कोकणनामा वृत्त- रायगड जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सेवानिवृत्त मुख्याध्यापक संघटनेची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा पेझारी येथील संघटनेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत पाटील यांच्या निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेस जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेल, पाली-सुधागड, कर्जत, मुरुड, रोहा, महाड व पुणे येथून मुख्याध्यापक उपस्थित होते.**

सभेच्या प्रारंभी अध्यक्ष श्रीकांत पिटील यांनी सर्व उपस्थित मुख्याध्यापकांचे स्वागत केले.सभेच्या कामकाजाला सुरुवात करण्यापूर्वी दिवंगत मुख्याध्यापिका स्व.भारती हळदवणेकर यांना व अन्य ज्ञात अज्ञातांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ज्येष्ठ मार्गदर्शक सदस्य पत्रकार बळवंत वालेकर यांनी स्व. हळदवणेकर यांनी केलेले शैक्षणिक,सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य विषद केले. नंतर संघटना सचिव अजय पाटील यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले.

सभेतील चर्चेत कार्याध्यक्ष अ.पा. म्हात्रे, उपाध्यक्ष एस.एम. पाटील, सल्लागार पी.डी. साठे, प्रशांत गायकवाड, अनंत चिनके, रमेश थळे, पी.बी. सावंत, म्हात्रे, संजीवनी जोशी, स्नेहा पाटील, मोहरे यांनी चर्चेत सहभाग नोंदविला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नंतर संघटनेचे खजिनदार पी.के. पाटील यांनी संस्थेचा जमाखर्च वाचून दाखविला त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यावेळी संघटनेची नोंदणी व ऑडिट बद्दल सखोल चर्चा झाली. जमाखर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

याच सभेत महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त मुख्याध्यापक संघटनेचे नियोजित पंढरपूर येथील ३० व ३१ ऑक्टोबर रोजीचे राज्यस्तरीय अधिवेशन अथवा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी रायगडातून मोठ्या संख्येने सेवानिवृत्त मुख्याध्यापकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन अध्यक्ष श्रीकांत पाटील व सचिव अजय पाटील यांनी केले. शेवटी सचिव अजय पाटील यांनी आयत्यावेळी कोणतेही विषय नसल्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने आभार मानून सभेची सांगता केली.

# विक्रेत्यांना सुविधा, नागरिकांना दिलासा; अलिबागमध्ये भाजी मंडई, मासळी मार्केटच्या कामाला वेग

**अलिबाग शहरातील भाजी व मासळी विक्रेत्यांसह सर्वसामान्य नागरिकांना अधिक चांगल्या आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अलिबाग नगर परिषदेच्या माध्यमातून नवीन भाजी मंडई आणि मासळी मार्केटचे बांधकाम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. शहरातील बाजारपेठ अधिक स्वच्छ, नियोजनबद्ध आणि सुविधायुक्त बनवण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पांतर्गत भाजी मंडईच्या उभारणीसाठी सुमारे चाळीस लाख रुपये तर मासळी मार्केटसाठी सुमारे एक कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. दोन्ही इमारतींचे बांधकाम नागरिकांच्या सोयी आणि आधुनिक गरजा लक्षात घेऊन केले जात आहे.**

या प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यासाठी वीज व बांधकाम समितीचे सभापती प्रशांत नाईक आणि उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कामाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बांधकामाची प्रगती, गुणवत्तेची स्थिती तसेच विक्रेते आणि ग्राहकांसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधांबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. विक्रेत्यांना हक्काची, चांगली व सुविधायुक्त जागा मिळावी आणि नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरणात खरेदी करता यावी, हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे प्रशांत नाईक यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. काम अत्यंत दर्जेदार पद्धतीने लवकरात लवकर पूर्ण करून त्याचा लाभ नागरिकांना मिळवून देण्यावर नगरपरिषदेचा भर आहे.

या नवीन व नियोजनबद्ध प्रकल्पामुळे बाजारपेठेतील व्यवस्थापन अधिक सुटसुटीत आणि शिस्तबद्ध होण्यास मदत होणार आहे. दोन्ही प्रकल्पांचे काम पूर्ण झाल्यानंतर अलिबागच्या बाजारव्यवस्थेला एक नवे आणि आधुनिक स्वरूप प्राप्त होणार असून, यामुळे विक्रेते व नागरिक या दोघांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. या पाहणी दौऱ्यादरम्यान नगरसेवक ॲड. ऋषिकेश माळी, अश्विनी ठोसर, नीलम हजारे, निवेदिता वाघमारे, योजना पाटील, जमाल सय्यद यांच्यासह नगरपरिषदेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**कोकणनामा** हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक उमाजी म. केळुसकर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि., डब्ल्यू-२३०, टीसीसी इंडस्ट्रीयल एरिया, खैरणे, नवी मुंबई जि.ठाणे, ४००७१०, महाराष्ट्र येथे छापून ए-१०१, पहिला मजला, गंगाधर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, चेंढरे-अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०१ येथून प्रकाशित केले. मो. ९०११३६०१६८.
RNI Regi. No. MAHMAR/2012/48580. Email : kokannama12@gmail.com